विकास शिक्षण संस्था, सांगली संचलित संजय गांधी हायस्कूल, मिरज, जि.सांगली या माध्यमिक शाळेचे विद्यासागर कॉलनी, एस.टी.वर्कशॉपच्या मागे, मिरज, जि.सांगली येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र १३१७/प्र.क्र.१२०/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० एप्रिल, २०१८

वाचा : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. माशास्थ २०१२/(५९/१२) माशि-२, दि. ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे क्र.माध्यमिक/२/कोवि/७८४५-४६/२०१७, दि.२९ मार्च, २०१७ चे पत्र.
२) उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली यांचा दिनांक ९/०३/२०१८ चा अहवाल.

प्रस्तावना :

विकास शिक्षण संस्था, सांगली संचलित संजय गांधी हायस्कूल, मिरज, जि.सांगली या मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित माध्यमिक शाळेचे, विद्यासागर कॉलनी, एस.टी.वर्कशॉपच्या मागे, मिरज, जि.सांगली येथे स्थलांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

सदर शाळेचे शासन मान्यता न घेता स्थलांतर करण्यात आले. तथापि त्यानंतर सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यतेचा प्रस्ताव प्रदीर्घ विलंबाने सादर केला आहे. शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत.

२. संदर्भ क्रमांक (२) येथील अहवालात, “सदरील शाळेची मान्यता काढण्यात आली असून यासंदर्भात वेळोवेळी झालेल्या सुनावणीत शाळेचे मान्यता काढण्याचे आदेश कायम ठेवण्यात आले असल्याचे नमूद आहे.”

३. सदर प्रकरणी शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै, २०१३ नुसार निकषांची पूर्तता होत नाही आणि आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन विकास शिक्षण संस्था, सांगली संचलित संजय गांधी हायस्कूल, मिरज, जि.सांगली या मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित माध्यमिक शाळेच्या स्थलांतराचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२११६०४२५४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2018.04.21 16:05:33 +05'30'

(प्रविण मुंढे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, गंजी गल्ली, हत्तीमहल सोमवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ००३.
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली
४. अध्यक्ष, विकास शिक्षण संस्था, सांगली
५. निवडनस्ती (एसएम-१)